दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३५२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०२ ऑगस्ट २०२५


**आजचा सुविचार**

तुमच्या सहभागा शिवाय
तुम्ही यशस्वी होणार नाही.
आणि तुमच्या सहभागा सोबत
तुम्ही कधी अपयशी होणार नाही.

## चालू एसटीत प्रवाशावर भयंकर हल्ला
## प्रवासी गंभीर जखमी, हल्लेखोराचे स्वत:वरही वार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, बारामती :** बारामतीमध्ये भयंकर घटना समोर आली आहे. बसमध्ये कोयत्याने हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. बारामती - इंदापूर मार्गावरील एसटी बसमध्ये एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. बारामती येथील काटेवाडी येथे चालू बसमध्ये एका व्यक्तीने कोयत्याने दुसऱ्या प्रवाशावर वार केला. या कोयत्याच्या हल्लयात प्रवासी गंभीर जखमी झाला आहे. विशेष म्हणजे, हल्लेखोराने स्वत:वरही कोयत्याने वार करुन स्वत:ला जखमी केल्याची माहिती प्रवाशांनी दिली. ही घटना आज, शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.

**बसमध्ये प्रवाशावर कोयत्याने वार...**

प्रवाशांच्या माहितीनुसार, बस काटेवाडी येथे थांबली असताना हा भयंकर प्रकार घडला. हल्लेखोराने अचानक बसमध्ये कोयता काढून एका प्रवाशावर वार केले, त्यानंतर त्याने त्याच कोयत्याने स्वत:वरही हल्ला केला. या घटनेने बसमधील प्रवासी घाबरले आणि एकच गोंधळ उडाला. जखमी प्रवाशाला तातडीने बारामती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून, त्याची प्रकृती गंभीर आहे. हल्लेखोरालाही तात्काळ ताब्यात घेतलं असून त्याला वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आलं आहे.

**वैयक्तिक वादातून हल्ला झाल्याची शक्यता...**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. प्राथमिक माहितीनुसार, हल्ल्यामागील कारण वैयक्तिक वाद असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणानंतर बारामती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबतचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पोलिसांनी हल्लेखोराची चौकशी सुरू केली असून, लवकरच या प्रकरणाचा तपास पूर्ण होईल, असं सांगितलं गेलं आहे.

## अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने
## महापालिका मुख्यालयात अभिवादन...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, पनवेल :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज (०१ ऑगस्ट) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, लेखा उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, लेखा परिक्षक संदिप खुरपे, आस्थापना विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आदर्श शिक्षक प्रा.गोविंद माने यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, हिमायतनगर :** शहरातील राजा भगीरथ व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्थापने पासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करणारे आदर्श शिक्षक म्हणून प्रा. गोविंद ग्यानोबाराव माने (पोटेकर )यांना ओळखले जाते. या अशा आदर्श शिक्षकांचा दिनांक ३१ जुलै रोजी सेवापूर्ती गौरव सोहळा शहरातील राजा भगीरथ शाळेत संपन्न झाला. यांच्या गौरव सोहळ्याला हदगाव हिमायतनगर विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर सह ह.भ.प.माधव महाराज बोरगडीकर यांनी उपस्थित राहून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती व भगीरथ राजाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी बोलताना आमदार कोहळीकर म्हणाले की, प्रा. गोविंद माने सरांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान पाहायला मिळाले सरांनी त्यांच्या कार्यकाळात असंख्य विद्यार्थ्यांना उच्च पदावर पोहोचविण्यासाठी योग्य मोलाचे मार्गदर्शन करून समाजात वावरत असताना त्यांनी चांगले विद्यार्थी घडवून एक देशसेवा केली. अशा या गुणवान गोविंद माने सरांचे पुढील आयुष्य समाजासाठी व देशसेवेसाठी कामी येवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# बाप्पाच्या आगमनाआधी अजित दादांकडून पुणेकरांना खूशखबर



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०१, पुणे :**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्या भारतात येताना पुणे जिल्ह्याला प्राधान्य देत आहेत. आम्ही त्यांना नाशिक, छत्रपती संभाजीनगरचे पर्याय देतो. मात्र, त्यांना पुणेच हवे असते. नाही तर परराज्यात जातो, असे सांगतात. त्यामुळे आमचा नाइलाज होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांना पुणे शहर आवडते,' असे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव पारितोषिक स्पर्धेचे वितरण उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते गुरुवारी (३१ जुलै) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झाले. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले, 'पिंपरी-चिंचवडचा आणि माझा जिव्हाळा आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडचे कार्यक्रम चुकवत नाही. गणेशोत्सव स्पर्धेमुळे शहरात चांगले वातावरण निर्माण होत आहे. गणेशोत्सव आता राज्य उत्सव म्हणून ओळखला जाणार आहे. त्याची मंत्रिमंडळात मंजुरी दिली आहे.' आमदार हेमंत रासने, शंकर जगताप, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, आरपीआयच्या चंद्रकांता सोनकांबळे, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, कैलास भांबुर्डेकर, 'राष्ट्रवादी' चे शहराध्यक्ष योगेश बहल, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, नाना काटे, अजित गव्हाणे, जगदीश शेट्टी आदी या वेळी उपस्थित होते.

**'रस्ते प्रशस्त करताना वाईटपणा घेतला'**

'प्रशस्त रस्ते, वाहतुकीच्या सुविधा निर्माण करताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते करताना मला सम ाधान वाटत नाही. परिस्थितीचा विचार करून रस्ते रुंदीकरण करावे लागेलच. पिंपरी-चिंचवडचे रस्ते चांगले आहेत, असे म्हणतात; पण त्या वेळी किती जणांचा वाईटपणा घेतला, हे माझे मलाच माहीत आहे. आता रिंग रोड आणि हिंजवडीबाबत काही कामे केली जात आहेत. शेतातून रस्ता गेला; म्हणून नाराज होऊ नका. ज्यांची घरे, जमिनी जातील, त्यांना आम्ही रस्त्यावर सोडणार नाही,' असेही अजित पवार यांनी सांगितले.

**रिंग रोडचे काम सुरू...**

वाहतूक कोंडी, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. रिंग रोडच्या कामाला सुरुवात झाली आहे. नवी मेट्रोही सुरू होणार आहे. केंद्राचा फायदा प्रत्येक राज्य उचलत आहे. त्याचा फायदा महाराष्ट्राला व्हावा, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणे खूप गरजेचे आहे.

**मेट्रोचा कालावधी वाढवणार...**

गणेशोत्सव काळात मेट्रोच्या वेळेत वाढ मिळावी, अशी सगळ्यांची मागणी आहे. त्यामुळे ती वाढविण्याची सूचना मेट्रोचे अधिकारी श्रावण हर्डीकर यांना देतो. गणेशोत्सव काळात त्या सुरू राहतील, अशी व्यवस्था करून देतो, असे आश्वासन पवार यांनी दिले. ढोलताशा किंवा डॉल्बीबाबत न्यायालयाने निबंध घातले आहेत. त्या बाबत काही शिथिलता आणता येईल का यासाठी राज्य सरकार म्हणून आम्ही प्रयत्न करू, असेही ते म्हणाले.

# महसूल विभाग हा शासनाचा आधारस्तंभ - पालकमंत्री पाटील



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, बुलडाणा :** महसूल विभागाच्या कार्यक्षमतेचा गौरव करत, जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी महसूल दिनानिमित्त विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांचे मनोबल वाढवले. महसूल विभाग हा शासनाचा कणा असून, जनतेला पारदर्शक व तत्पर सेवा देण्यासाठी या विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले. महसूल दिनाचे औचित्य साधून जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी आज शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे समस्या जाणून घेतल्या. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याचे निर्देश, पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी यावेळी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित महसूल दिन कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर तांबे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, डॉ. जयश्री ठाकरे, समाधान गायकवाड, उपमुख कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल व विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. महसूल दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना महसूल विभागाच्या कार्याची सखोल प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, शासन आणि जनतेच्या दरम्यान विश्वासाचे सेतू बांधण्याचे काम महसूल विभाग करत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे हक्क, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, विविध शासकीय योजना आणि नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित निर्णय या विभागाच्या माध्यमातून घेतले जातात. त्यामुळे शासकीय कामामध्ये नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक परिणामकारक बनवण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. पालकमंत्र्यांनी महसूल कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचे कौतुक करत, पारदर्शकता, जबाबदारी आणि तत्परता या गुणांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच शासकीय कामकाज करताना पालकमंत्री म्हणून मी, सदैव अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले की, महसूल विभाग विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत असून शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडवले जात आहेत. दि. ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अंतर्गत नागरिकांच्या तक्रारीवर तात्काळ उपाय केले जातील, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे, शेतकऱ्यांचे कामे प्राधान्याने, पारदर्शक व गतिमानतेने करा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी महसूल दिनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'ई महसूल प्रणाली माहिती पुस्तिका'चे ऑनलाईन विमोचन पालकमंत्री व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी वनहक्क पट्टे, नझूल भूखंड वाटप, जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना सातबारा वितरण आदींचे वाटप करण्यात आले. उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रास्ताविकात महसूल दिन व सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तहसिलदार वृषाली केसकर यांनी तर आभार उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी केले. पालकमंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देवून करण्यात आला. यामध्ये उपजिल्हाधिकारी डॉ.रामेश्वर पुरी, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसिलदार भुषण पाटील, तहसिलदार वृषाली केसकर, नायब तहसिलदार एस.एस.वट्टे, सहा.म.अधिकारी दिपक भाष्कर, महसूल सहायक जे.एन.वाघ, मंडळ अधिकारी संजय दिनकर जोशी, मंडळ अधिकारी शिवाजी भरगडे, ग्राम महसूल अधिकारी अमोल हिरालाल राठोड, वाहन चालक अशोक देवकर, शिपाई रामेश्वर शिंदे, महसूल सेवक तौफिकखान अब्दुलखान पठाण, पोलीस पाटील योगेश मधुकर पाटील तसेच उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी म्हणून तहसिलदार संतोष काकडे, सहा.म.अधिकारी पल्लवी राठोड, मंडळ अधिकारी किशोर पाटील, महसूल सेवक आर.एन.अडकणे यांचासह भूमी अभिलेख विभाग, सह निबंधक कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सत्कार करण्यात आला.

## नैसर्गिक आपत्ती संदर्भात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी घेतला आढावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, बुलडाणा :** जिल्ह्यातील पावसामुळे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी शुक्रवार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीची मदत पोहोचवण्याचे व पंचनामे तत्काळ पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्ती ही अनपेक्षित असली, तरी नागरिकांवर त्याचे परिणाम गंभीर असतात. अशावेळी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने प्रतिसाद द्यावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना कुठलाही अडथळा न होता शासकीय मदत तातडीने पोहोचली पाहिजे. नुकसानीचे वर्गीकरण करुन पंचनाम्याचे काम झपाट्याने पूर्ण करा. जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रातील नुकसानीचे मदत तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावावी. तसेच शासन स्तरावरील प्रस्ताव सादर करावा, जेणेकरून अनुदान व भरपाई तत्काळ मंजूर होऊ शकेल.

बैठकीत पूरस्थितीग्रस्त, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेली शेती, घरांचे नुकसान, रस्ते वाहतूक तसेच वीज आणि पाणीपुरवठा या बाबींची सविस्तर माहिती घेण्यात आली. तसेच एप्रिल ते जून २०२५ या कालावधीत अवेळी पाऊस, गारपीठ व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे मदत येत्या ८ दिवसात लाभार्थ्यांना मिळेल यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी दिले.




## 'लालपरी'ची रुतलेली चाके

'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीद असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) सेवेत काळानुरूप बदल झाला, हे नाकारता येणार नाही. 'गाव तिथे एसटी' हे वाक्य अभिमानाने मिरविणाऱ्या महामंडळाने गेल्या दोन दशकांत 'शिवाई', 'शिवनेरी', 'शिवशाही', 'विठाई', 'अश्वमेध' आदी विविध नावांनी सेवा सुरू केल्या. इलेक्ट्रिक बस आणल्या. ज्येष्ठांपासून महिलांपर्यंत विविध घटकांसाठी सवलत योजना राबवितानाच ऑनलाइन बुकिंगपासून अनेक सुविधाही सुरू केल्या.

आषाढी एकादशी, माहूर यात्रा, तुळजापूर यात्रा, उरूस, उन्हाळी सुट्या, सण, कोकणातील गणेशोत्सव या काळात 'एसटी'कडून फेऱ्या वाढवून सेवा दिली जाते. 'एसटी'च्या काही बस गळक्या असल्या, काहींमध्ये आसने चांगली नसली, तरी सेवेतील सातत्यामुळे खासगीकरणाच्या आजच्या काळात 'एसटी'ची लोकप्रियता टिकून आहे. 'एसटी'चे अधिकारी, कर्मचारी यांची मेहनत आणि सकारात्मक कार्यपद्धत यांचा यात म हत्त्वाचा वाटा आहे.

असे असले, तरी 'एसटी'ला सुधारण्यास मोठा वाव आहे. मागील सहा-सात वर्षांपासून भाडेतत्त्वावरील 'शिवशाही' सेवा आणि नवीन बसची आपल्या कार्यशाळेतील बांधणी बंद करणे या दोन गोष्टी 'एसटी'च्या व्यवस्थेवर तणाव निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. बस बांधणी बंद केल्याने नवीन गाड्या मिळण्याची प्रक्रिया बंद झाली. मराठवाड्यात 'एसटी'च्या सेवेत असलेल्या पन्नास टक्केहून अधिक गाड्यांची दुरवस्था झाली आहे. सध्या पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील कार्यशाळांत जुन्या बसगाड्यांची पुनर्बांधणी केली जाते. नवीन बस मात्र बाहेरून बांधली जाते.

१९८२मध्ये एसटी महामंडळाच्या सेवेत 'एशियाड' बस दाखल झाली. या सेवेते तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कौतुक केले होते. मात्र, ४३ वर्षांनंतरची सेवेची परिस्थिती पाहता फारसे समाधानकारक चित्र नाही. एसटी महामंडळाकडे कुशल कामगार; तसेच एसटी चालविण्यासाठी प्रशिक्षित अधिकारी असताना महाराष्ट्रापेक्षा अन्य राज्यांची बससेवा चांगली वाटते. कर्नाटकात असलेली व्होल्व्हो सेवा म हाराष्ट्रात सुरू करण्याचा विचार आहे. त्यासाठी मंत्र्यांनी काही महिन्यांपूर्वी कर्नाटक दौरा केला. यापूर्वी आपल्याकडे 'व्होल्व्हो'चा प्रयोग झाला होता, तो पुन्हा राबविण्याचे ठरलेच तर ते मोठ्या शहरांपुरते मर्यादित ठेवले पाहिजे. राज्यातील नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घेतला गेला पाहिजे. 'एसटी'ने 'मिडी' बसचाही प्रयोग केला. याशिवाय आता भाडेतत्त्वावर सात मीटरच्या इलेक्ट्रिक बस घेण्यात आल्या. त्यांत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसल्यास अडचणी आल्याचीही अनेक उदाहरणे समोर आली आहेत. सात मीटरच्या बसप्रमाणे पुन्हा 'मि डी' बसचा प्रयोगही राबविण्याचा प्रशासन विचार करीत आहे.

एसटी गाड्यांच्या दुरुस्तीसाठी कुशल काम गारांची गरज आहे. कार्यशाळेतील भरती कित्येक वर्षांपासून बंद आहे. 'आयटीआय' प्रशिक्षित शिकाऊ उमेदवारांच्या जीवावर सध्या 'एसटी'चे काम सुरू आहे. पुढील पाच वर्षांत नवीन २५ हजार एसटी आणण्याचा संकल्प प्रत्यक्षात आल्यास 'एसटी'ची सेवा आणखी मजबूत होईल. मात्र, त्यासाठी प्रबळ इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. सरकारला 'एसटी' महामंडळाच्या आर्थिक बाजूचाही विचार करावा लागणार आहे.

'एसटी'ने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली. मात्र, महसुली उत्पन्न त्या प्रमाणात वाढत नाही. सरकारने पैसे दिले तर कर्मचाऱ्यांचा पगार होतो. मेहनतीचे, हक्काचे पैसे मिळविण्यासाठी 'एसटी' कर्मचाऱ्यांना किती काळ संघर्ष करावा लागणार, हा प्रश्न आहे. यापुढील काळात जास्त प्रयोग न करता, 'एसटी' प्रशासनाने प्रवाशांना नेमके काय हवे, याचा विचार करून सुविधा पुरविल्या पाहिजेत. प्रयोग करून 'एसटी'ची चाके तोट्याच्या चिखलात आणखी रुतवू नयेत, एवढीच अपेक्षा.

# चला दोस्तहो मैत्रीवरती बोलू काही...

ज्यांच्या जवळ मनातील भाव व्यक्त करतांना लज्जा संकोच वाटत नाही, खोटे बोलावेसे वाटत नाही, फसवावेसे वाटत नाही पाप-पुण्याची कबुली देण्यास मनकचरत नाही, ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावासं वाटतो, ज्याच्याजवळ पराभवाचे शल्य उघडे करायला कमीपणा वाटत नाही, ज्याच्या सुखदुःखाशी आपण एकरूप होऊ शकतो तो खरा मित्र आणि ती खरी मैत्री.

बंधना पलीकडले हे एक नाते असते. शब्दाचे त्याला बंधन नसते. दुःखाला तिथे थारा नसतो आणि गोडवा मैत्रीत असतो.

जागतिक स्तरावर तीस जुलै रोजी मैत्री दिवस म्हणजेच फ्रेंडशिप डे साजरा केला जातो, परंतु भारतात ऑगस्टमध्ये येणाऱ्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो.

फ्रेंडशिप डे अर्थातच मैत्री दिवस. हा संपूर्ण जगात उत्साहात साजरा केला जातो, कारण असा एखादाच कोणी माणूस असेल ज्याला मित्र नाही, आणि ज्याला मैत्रीचे महत्त्व ही माहीत नाही. आपल्या सर्वांच्या आयुष्यात कमी किंवा अधिक प्रमाणात मित्र असतात, मित्रांसमवेत घालवलेला वेळ कोणास आवडणार नाही. विशेषतः बालपणातील मैत्री खूप घट्ट असते. ज्याची आठवण कायमची मनात राहते. मैत्रीच्या नात्यात जात धर्म वगैरेला महत्त्व नसते आणि त्याचा अडथळा नसतो त्या नात्याला एक खास महत्त्व आहे.

मैत्री एक असं नातं आहे ज्याला एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार निवडतो. बालपणात नकळत बरेच मित्र बनून जातात. ज्यामध्ये काही मित्र असेही असतात जे शाळेपासून ते कॉलेजपर्यंत साथ देतात तर काही चांगल्या आणि वाईट काळात देखील आपली मैत्री निभावतात. तथापि असे मित्र फारच कमी असतात जे आयुष्यभर आपली मैत्री जपतात. म्हणून मैत्री करताना आपण सावध असायला हवे.

आपण सहजच म्हणत असतो -समान गुणे व्यसनेशुच् सख्यम्

मित्र असे असतात ज्यांचा सहवास आपल्या वर्तमान आणि भविष्यावर प्रभाव टाकत असतात . वाईट सवय असलेल्या मित्रांचा सहवास आपल्याला आणि आपल्या भविष्याला खराब करतात, तर चांगली विचारसरणी आणि चांगल्या सवयी असलेले मित्र आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या जीवनाला सुशोभित करण्यास मदत करतात.

आजकाल मित्रांना अनेक वर्गात विभागले आहेत जसं की एक सारखा छंद जोपासणारे मित्र, व्यवसायी मित्र, कामाच्या ठिकाणचे मित्र,सोशल मीडियावर होणारे मित्र, फेसबुक, ईंस्टाग्रामवरले मित्र, इत्यादी पण जे खरे मित्र असतात त्यांची आवड निवड एक सारखी असते. ते आपल्याला आयुष्याचा पदोपदी साथ देतात ते नेहम ीच आपल्या चांगल्याचा विचार करतात. सोशल मीडियावरील मित्र करताना योग्य ती खबरदारी घेणे सध्या आवश्यक बाब झाली आहे. कारण अनेक वेळा फेसबुक वरील मित्राचा चेहराच दिसत नसतो आणि बऱ्याच वेळा असलेला चेहराही वेगळाच असतो. त्यामुळे फसवणूक होण्याची आणि फसवण्याची शक्यताही असते. राजकीय क्षेत्रातही मित्र म्हणून उल्लेख केला जातो पण राजकारणात कोणीच कोणाचा मित्रही नाही तर शत्रूही नाही. कारण शत्रू असणारा मित्र होतो आणि मैत्री असणारा शत्रू होतो असे काहीतरी आहे त्यामुळे त्यांच्या बाबतीत मैत्री दिवस लागू होणार नाही असे वाटते.

आपल्या आयुष्यात देखील कोणी खरामित्र असेल तर त्याला मैत्री दिनाच्या या खास प्रसंगी आपल्या त्या खास मित्राला तो खास असल्याची जाणीव नक्कीच करून देत असतो. हा दिवस आपल्या जिवलग मित्रांसह साजरा केले जातो. बरेच लोकं हा दिवसआपल्या मित्रांसह साजरा करण्यासाठी विविध योजना आखून हा दिवस साजरा करतात. संपूर्ण दिवस जरी नाही तरी जेवढे शक्य असल्यास आपल्या व्यस्ततेमधून काही क्षण आपल्या मित्रांसाठी नक्की काढतो,वा काढावे.

या दिवशी मैत्रीचे निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक धागे,शुभेच्छापत्र,आता काही वर्षांपासून वॉट्सॅप वर

शुभेच्छा संदेश, फेसबुकवर संदेश दिले जातात.

एकत्रित भोजनाचे बेत आखले जातात.

एकमेकां पासून दुर असतील तर फोन वरुन बोलून जवळीक साधली जाते.

भारतात मैत्री दिवस ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा करतात.

अमेरिकेत सरकारने एका माणसाला ठार मारले. त्याचा एक मित्र होता,त्याला मि त्राचे मरणाचे दुःख झाल्याने जीवन संपवले. त्याच्या स्मरणार्थ हा दिवस १९३५ पासून मित्रता दिवस फ्रेन्डशिप डे साजरा होऊ लागला.

मैत्री कशी असते ह्या विषयीच्या दोन गोष्टी बघा, घट्ट मैत्री कशी असते....

जेव्हा छ.शिवाजी महाराजांनी किल्ले हाती घेण्याची मोहीम चालवली तेव्हा प्रत्येकवेळी तानाजी आघाडीवर होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक शूरवीर असतानाही जेव्हा कोंडाणा जिंकून आणण्याची वेळ आली तर महाराजांच्या मनात एकच नाव होते ते म्हणजे तानाजी मालुसरे.

इतिहासातील हे युद्ध सिंहगडची लढाई म्हणून नोंदवले गेले आहे. तेव्हा ते कोंडाणा म्हणून ओखळले जात होते. शिवाजी महाराजांचे परममित्र तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त असताना हे सर्व घडले होते. कोंडाणा किल्ल्यासह २३ किल्ले पुरंदर करारामध्ये म ुघलांना सोपविल्यानंतरही मोगल सल्तनत तहान भागली नव्हती. औरंगजेबाने आपला विश्वासू उदयभानु राठोड यांना कोंडाणा किल्ल्याकडे पाठवून मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा नेम धरला होता.तेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या शूर व प्रिय मित्राला युद्धाच्या घटनेत सामील करायचे नव्हते,




कारण तानाजीच्या घरी लग्नाची तयारी सुरु होती. पण स्वराज्य आणि छ. शिवाजी महाराजांवर संकट आल्याचे कळले तर तानाजींनी मुलगा रायबाच्या लग्नाची पर्वा न करता भगवा परिधान केला. अत्यंत कठीण प्रसंगी राज्यासाठी कामास येण्यापेक्षा मोठे भाग्य काय असावे असा विचाराने तानाजींची छाती गर्वाने फुलून गेली.आधी लग्न उरकून घेऊ, मग कामगिरीसाठी निघू असे शेलार मामांनी म्हटल्यावर तानाजींनी उत्तर दिले की आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे. तानाजी जिजाऊंना भेटून रायबाची जबाबदारी शिवाजी महाराजांच्या हाती देऊन



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मो.८९९९५६६९१७**

म्हणाले की कोंढाण्याहून परतलो तर मी म ुलाचे लग्न लावेन आणि जर मेलो तर तुम्ही त्याचे लग्न लावून द्या.

४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी म ालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन मराठा सैन्य निघाले. आपले प्राण पणाला लावून कोंडाणा ताब्यात घेतला. महाराजांना विजयाची बातमी कळताच आनंद झाला पण तानाजींनी प्राण गमावले कळताच त्यांचे अश्रु अनावर झाले आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले- गड आला पण सिंह गेला...

**मित्र म्हणजे असा घागा,**
**मोकळं व्हावं अशी जागा,**
**कोणतच नाटक नाही....**

प्रत्येकाच्या आयुष्यात असे मित्र मैत्रिणी असतातच.. तर असाच एक मित्र म्हणा, मैत्रीण म्हणा आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आहे! कोण बरं?? तर ते म्हणजे पुस्तक ! पुस्तकाशी मैत्री. ही पुस्तके लहानपणापासून तर शेवट पर्यंत बाल साहित्यापासून तर भगवद् गीतेपर्यंत साथ देणारी ही जिवाभावाचे मित्र- मैत्रीण! आपल्या एकटेपणात आपला साथ देणारी...अजून...

मैत्री हा शब्द आठवताच प्रथम डोळ्यांसमोर उभी राहते ती कृष्ण-सुदामा यांची मैत्री. महाभारताच्या काळातली ही मैत्री. पण भारताच्या इतिहासात ती अमर होऊन बसली. कृष्ण श्रीमंत होता; तर सुदामा गरीब होता. कृष्ण देखणा, बलवान; तर सुदामा हडकुळा, खंगलेला आणि रूपाने सामान्य. पण दोघांची घनदाट मैत्री झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात गुरुगृही दोघेही शिक्षण घ्यावयास आले. त्या आश्रमात त्यांची इतकी मैत्री झाली की, एकमेकांशिवाय एकमेकांना चैन पडायचे नाही. कृष्ण मनानं इतका मोठा, इतका उदार की त्याने आपला मित्र एक दरिदी भिक्षुक ब्राह्मण आहे याचा कधी विचारही केला नाही.

आश्रमातले दिवस संपले. पुढे श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला. सुदाम्याच्या कानी त्याची किर्ती साहजिकच पडली. त्याला कृष्णाला भेटावयाची, बघावयाची इच्छा झाली. तो द्वारकेला आला. राजवाड्याच्या दाराशी भीत भीत उभा राहिला. पहारेकरी ओरडले. त्याला आत जाऊ देईनात. कृष्णाने विचारले 'कोण आहे रे तिकडे?' सुदामा थरथर कापत म्हणाला, 'मी सुदामा...' सुदामा हे नाव कानी पडताच कृष्ण धावत आला आणि त्याने सुदाम्याला कडकडून मिठी मारली. प्रेमाने आत नेऊन आपल्या सिंहासनाशेजारी बसवले आणि विचारले, 'काय भेट आणलीस माझ्यासाठी?' सुदाम्याने लाजत लाजत अंगावरला पंचा पुढे केला. त्यात पोह्यांची पुरचुंडी होती. कृष्णाला आवडणारे पोहे सुदाम्याने आठवणीने त्याच्यासाठी आणले होते. कृष्णाने अधाश्यासारखे ते पोहे खाल्लेत. त्याच्या हृदयात गहिवर दाटून आला. डोळ्यात पाणी उभे राहिले. म्हणाला, 'सुदामा, किती रे तुझे माझ्यावर प्रेम. अरे, मला पोहे आवडतात हे लक्षात ठेवून तू प्रेमाने मला पोह्यांची भेट दिलीस!'

कृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची ही कथा! पण तिचे नुसते स्मरण झाले तरी डोळ्यात पाणी येते. दोन व्यक्तीं मध्ये मैत्रीची भावना केवढी महान असू शकते हे ही कथा सिद्ध करते. खरोखर, मैत्री किती श्रेष्ठ आहे.

प्रत्येक माणसाला मित्र हा हवाच ! पुरुषाला मित्र आणि स्त्रीला मैत्रीण म्हणजे एक आधार असतो. सुप्रसिद्ध लेखिका विभावरी शिरुरकरांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की शंभर मैत्रिणींपेक्षा स्त्रीला एक पुरुष मित्र अधिक आवडतो ! तर.....

**पु.ल.देशपांडे म्हणतात,**
**मैत्रीची सोपी व्याख्या आहे.**
**रोज आठवण यावी असं काही नाही**
**रोज भेट व्हावी असं काही नाही**
**एवढेच कशाला रोज बोलणं व्हावे असंही नाही**
**मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री**
**आणि तुला याची जाणीव असणं**
**ही झाली मैत्री...**

ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करता येतात ते व्यक्त करताना संकोच वाटत नाही आणि त्यात खोटेपणा नसतो किंवा फसवा फसवी नसते ज्याच्याजवळ आपण आपली गुपित अतिशय मोकळेपणाने उघडे करतो आणि एकमेकांच्या सुखदुःखाची एकरूप होऊन जात असतो अशा भावनेलाच किंवा अवस्थेला मैत्री म्हणतात आणि जो ते निभवतो तोच खरा मित्र .अशी एक मैत्रीची व्याख्या आहे. खरा मित्र असतो तो नेहमीच योग्य अशा गोष्टी करण्याचा सल्ला देत असतो. एकमेकांच्या प्रगतीची आणि समृद्धीसाठी एकमेकासाठी प्रयत्न असणे

तसेच आनंद असणे हीच मैत्री आहे.

असा मैत्रीचा धागा जपू या....

**सर्वांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा !**

## फाईन...

वाहतूकनियम तोड
लगे बसणारं फाईन
दंड भरणे तात्काळ
कारवाई ऑनलाईन

सगळा चिठ्ठा उघडे
जबरदस्त ती फाईन
कायद्यातसुव्यवस्था
होईलं सगळे फाईन

सि सी टिव्ही तत्पर
पुरावे सु स्पष्ट देईन
माणूस नाही आम्ही
कुणा कशास भिईन

लाचलुचपत अडली
जरा कष्टाचे खाईन
चिरी मिरी बंद सारी
रे स्थिती सुपरशाईन

नवीन दंडा सोबतचं
जुन्हे गुन्हे ही जॉईन
समजेल शिस्त काय
सरळ वाकडी लाईन

सिस्टिम हँग होताचं
मशीनला दोष देईन
मानव निर्मित सगळे
ये रे मागल्या होईन

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## येरवड्यात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०१, येरवडा (पुणे) :** येरवडा लक्ष्मी नगर येथे साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पुणे शहरातर्फे भव्य अल्पोपहार व लाडू वाटपाचा कार्यक्रम पार पडला. सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देत या उपक्रमाचे उद्घाटन पुणे शहर उपाध्यक्ष सचिन भाऊ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

अण्णाभाऊ साठे हे दलित, शोषित, वंचित सम ाजाचे हक्कासाठी झगडणारे प्रखर साहित्यिक आणि क्रांतिकारक होते. त्यांच्या साहित्याने सर्वसामान्यांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला मान्यवरांमध्ये श्रीकांत जगताप, दत्ता मांढरे, आकाश चव्हाण, शशिकांत जगताप, पप्पू कांबळे आदींची उपस्थिती होती. महिला कार्यकर्त्यांमधून सपना चव्हाण, नीता जगताप,



अलका लांडगे, शोभा मांढरे, राधा मांढरे, सीमा जगताप, लक्ष्मी जगताप यांनी सक्रिय सहभाग घेतला.

परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मान्यवरांनी आपल्या भाषणातून अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनाची उजळणी करत त्यांचे समाजपरिवर्तनातील योगदान अधोरेखित केले. समारोपाला सर्व उपस्थितांना अल्पोपहार व लाडू वाटप करून सामाजिक सलोखा, ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. उपस्थित कार्यकर्त्यांनी अण्णाभाऊंच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारी जीवितहानी थांबवा
### खा.धानोरकर यांची गडकरी यांच्याकडे मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.३१, चंद्रपूर :** खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन चंद्रपूर महामार्गावर खड्ड्यांमुळे होणारे अपघात आणि होणारी जीवितहानी थांबविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या निवेदनात चंद्रपूर महामार्गावरील गंभीर परिस्थितीकडे केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले. जानाळा फाट्याजवळ खड्ड्यांमुळे झालेल्या दुर्दैवी अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. तर चंद्रपूर- नागपूर महामार्गावरील साखरवाही फाट्याजवळ रस्त्याच्या खराब स्थितीमुळे भरधाव वेगाने येणाऱ्या कारच्या धडकेत पती-पत्नीचा मृत्यू झाल्याची घटना त्यांनी नमूद केली. याव्यतिरिक्त, बामणी-राजूरा महाम र्गावरील वर्धा नदीच्या पुलाजवळ एका महिला पोलिस कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला आहे. या घटना आपल्या विभागाच्या घोर निष्काळजीपणाची आणि बेफिकीर कार्यपध्दतीची भयावह परिणाम दर्शवितात असे खा. प्रतिभा धानोरकर यांनी म्हटले आहे. चंद्रपूर महाम र्गावरील खड्ड्यांची समस्या नवी नाही, या संदर्भात वारंवार तक्रारी करूनही परिस्थिती 'जैसे थे' असल्याचे खा.प्रतिभा धानोरकर यांनी निदर्शनास आणून दिले. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून, ही केवळ प्रशासकीय चुक नसून, नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेशी केलेला गंभीर खेळ आहे, असेही त्या म्हणाल्या. याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी केली.

या अपघातांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडने कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करावी. तसेच, चंद्रपूर महामार्गावरील सर्व खड्डे आणि खराब रस्त्यांची युध्दपातळीवर दुरुस्ती करावी आणि भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना त्वरित लागू कराव्यात अशी मागणी त्यांनी केली.

## जिल्हा परिषद हायस्कूल येथे पहिली शिक्षण परिषद संपन्न




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०१, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ च्या पहिल्या सत्रात कुंडलवाडी आणि हुनगूंदा केंद्र अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागणी या तिन्ही शाळेच्या संयुक्त विद्यमाने या वर्षाची पहिली शिक्षण परिषद संपन्न झाली. या कार्यक्रमासाठी बिलोली तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बी.एम.पाटील विशेष करून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी विषय तज्ञ म्हणून गुणवंत हलगरे, सुरेश राठोड, ढाकणे, कुंडलवाडी केंद्राचे विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख वाय.एस.कौटकर तसेच हुनगूंदा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.स्वामी हे उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये गटशिक्षणाधिकारी बी.एम.पाटील यांनी वेगवेगळ्या मुद्द्यावर सविस्तर अशी चर्चा केली. प्रत्येक शाळेची गुणवत्ता कशी आहे. याचं त्यांनी आढावा घेतला. काही सूचना सुद्धा प्रभावीपणे त्यांनी सांगितल्या. तसेच जे काही शाळेचे उपक्रम आहेत. त्या उपक्रमांमध्ये सर्व शाळेने सहभाग घ्यावा असेही सुचविले. तसेच प्रशासकीय सूचना सर्वांनी पूर्ण कराव्यात. निपुण अंतर्गत त्यांनी प्रत्येक शाळेचा आढावा घेतला. त्यामध्ये शाळेची गुणवत्ता कशी वाढेल व विद्यार्थी कसे पुढे येतील. यासाठी प्रत्येक शिक्षकाने दक्ष राहायला हवे याचाही विचार त्यांनी बोलून दाखवला. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरलीच्या विद्यार्थ्यांचे उपक्रम व त्यांची गुणवत्ता पाहून साहेबांनी शाळेच्या मुख्याध्यापिका व सहशिक्षक यांची प्रशंसा सुद्धा केली. या प्रसंगी सहशिक्षक राजू भद्रे, मुळावकर, भाग्यश्री गोसके, शिवकन्या पटवे यांनी सुलभक म्हणून काम पाहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.कल्पना सुरकुटलावार यांनी केले तर उपस्थितांचे आभार निता दमकोंडवार यांनी केले. सदरील शिक्षण परिषद यशस्वी होण्यासाठी बन्नारे, चौधरी, रविंद्र दावलेकर, हारे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रमाची सांगता सुरूची भोजनाने झाली.

## अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०१, कळंब (धाराशिव) :** कळंब - तालुक्यातील हसेगाव के येथील पद्मश्री शंकर बापू माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी सामाजिक न्यायाचे प्रणेते अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महान विभूतींच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक परमेश्वर पालकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर आणि लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्तीवर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक समतेचा व देशप्रेमाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनावर आधारित कविता आणि लोकगीतांचे सादरीकरण केले. तसेच टिळकांच्या कार्यावर आधारित भाषणे सादर केली. शिक्षकांनी ही या दोन्ही महापुरुषांच्या योगदानावर विचारमंथन करून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाबासाहेब दराडे यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आज सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** सालाबादप्रमाणे यंदाही यावर्षी टाकळी ढोकेश्वर येथे श्री सावता महाराज व वै.ह.भ.प विठ्ठल महाराज पायमोडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज शनिवार, दिनांक ०२ ऑगस्ट ते रविवार, दिनांक ०३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध गाडामालक उपस्थित राहणार असल्याची माहिती पारनेर तालुका बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे यांनी दिली.

शेतकरी वर्गासाठी मुख्य आकर्षण असलेला पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. पारनेर तालुका पठार भाग, बैलगाडा मालक, बैलगाडा शैकिन, टाकळी ढोकेश्वर ग्राम स्थांच्या वतीने श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात



**श्री.संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त 'पठार केसरी' बैलगाड्यांच्या भव्य शर्यती**

आलेल्या भव्य बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष व बैलगाडा शौकीन यांच्या हस्ते होणार असून पंचक्रोशीतील बैलगाडा मालक व शेतकरी ग्रामस्थांनी लाभ घेण्याचे आवाहन सावतामाळी उत्सव समिती आयोजक यांनी केले आहे.

मागील आठवड्यात टोकण वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या बैलगाडा शर्यतीसाठी टोकण पद्धतीने फि देणगी स्वरुपात स्विकारण्यात आली. यावेळी जवळपास ३५० बैलगाडा टोकणची नोंदणी झाली आहे.

या शर्यतीमध्ये पारनेर तालुका पठार केसरी, पहिल्यात फळीफोड, द्वितीय फळीफोड, तृतीय फळीफोड, घाटाचा राजा अशा या बैलगाडा शर्यतीसाठी बक्षिसांची खैरात केली जाणार आहे.

प्रथम क्रमांकाचे बक्षीस आयोजक यांच्या वतीने १ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास आयोजकांच्या वतीने ७५ हजार रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ५१ हजार रुपयांचे बक्षीस आयोजक यांच्या वतीने देण्यात येणारा असल्याची माहिती बैलगाडा संघटना तसेच आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

# हिमायतनगर तालुक्यात १ ते ७ ऑगस्ट कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन
## लाभ घेण्याचे तहसीलदार पल्लवी टेमकर यांचे आव्हान

**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.०१, हिमायतनगर :** महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरिता दिनांक ०१ ऑगस्ट महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने दिनांक ०१ ते ०७ ऑगस्ट २०२५ रोजी कालावधीत सप्ताहाचे आयोजन आले आहे. सप्ताहात विशेष मोहीम, कार्यक्रम, उपक्रम, शिबिरे व महसुल अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ हिमायतनगर तालुक्यातील जनतेने घ्यावा असे आवाहन तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, हिमायतनगर तहसिल कार्यालयात तहसिलदार पल्लवी टेमकर यांनी पत्रकार परिषद घेवून महसुल सप्ताहाची रुपरेषा व या कालावधीत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबाबत माहिती दिली. ते म्हणाले महसुल विभागाने महसुली कामे वेळेच्या वेळी पुर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसुलीच्या नोटीस एस पाठविणे, म ोजणी करणे, अपील प्रकरणाची चौकशी करणे इत्यादी कामे वेळेत करणार्या अधिकारी व कर्मचार्याचा सत्कार करून महसूल विभागाने केलेल्या कार्याचा आढावा हा जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे सांगितले. व ०१ ऑगस्ट महसूल दिन साजरा करुन सप्ताह शुभारंभ, ०२ ऑगस्ट शासकीय जागेवर सन २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी पात्र असलेल्या कुटुंबाना सदर अतिक्रमण जागेचे पट्टे वाटप करणे, ०३ ऑगस्ट पाणंद शिव रस्त्याची म ोजणी करून त्यांच्या दुतर्फी झाडे लावणे, ०४ ऑगस्ट छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळ निहाय राबविणे, ०५ ऑगस्ट विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी न झालेल्या लाभार्थ्यांना घर भेटी करुन डी.बी.टी करुन अनुदान वाटप करणे, ०६ ऑगस्ट शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे निष्कासित करुन त्या अतिक्रमणमुक्त जमीनीबाबत शासन धोरणानुसार अमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणाली प्रमाणे धोरण पुर्णत्वास आणि सप्ताह समाप्ती सांगता करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पत्रकार बांधव व महसूल अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहराची उत्तम कामगिरी

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०१, ठाणे :** पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विक्री संदर्भात विशेष मोहीम राबवून कडक कारवाई करण्या संदर्भात आदेश दिले होते. त्याअनुषंगाने अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे डॉ.पंजाबराव उगले व पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे अमरसिंह जाधव यांनी सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सहा.पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे विनय घोरपडे यांच्या सूचनेप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के यांनी विशेष मोहिम राबिली. या मोहीम अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे बातम ीदारा मार्फत मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ठांचे परवानगीने सापळा कारवाई केली असता दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी २२.३० वा. उथळसर नाका येथील सुप्रब सोसायटी येथील रसोई पोळी भाजी केंद्र ठाणे या ठिकाणी आरोपी म ोहेमद मकसूद मोहमद अहमद, वय ४२ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा.ठि. दुनियागंज आंशिक, फुलपूर, जि अलाहाबाद राज्य उत्तरप्रदेश हा आपले ताब्यात रू. ३,३९,००,०००/- किमतीचा ३ किलो ३९० ग्रॅम ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगताना मिळुन आले. व पंचनामा करून सदर आरोपीला चरस हा अंमली पदार्थ व अंगझडतीतील त्याचे वापरातील कपडे, एक पाकीट व एक प्लॅस्टिकची मोठी पिशवी मिळून आली.



त्या पाकिटची तपासणी केल्यानंतर त्यामध्ये रोख रू १७७०/- व आधारकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, नोटीस असा एकुण ३,३९,०७,२७०/- रू. किमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आलेले. सदरबाबत राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ३५६/२०२८ एन.डी.पी.एस कायदा कलम १९८५ चे कलम कलम ८ (क), २० (ब) ळळ (क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक आरोपीची दिनांक ०४/०८/२०२५ रोजीपावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर आहे.

नमूद गुन्ह्याचा पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांच्या कडुन करण्यात येत आहे.अटक आरोपी हा प्रयागराज, उत्तरप्रदेश चा रहीवाशी असुन तो चरस हा अंमली पदार्थ ठाणे येथे विकी करण्याकरीता आला असताना त्यास ताब्यात घेवुन वर नमुद प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. वर नमुद केले कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेला अंमली पदार्थाचे उत्पादन, विकी, वाहतूक, साठवणूक यामध्ये कोण कोण सहभागी आहे ? याबाबतचा तपास सुरू आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के, सपोनि / निलेश मोरे, सोमनाथ कर्णवर पाटील, पोउपनि / राजेंद्र निकम, नितीन भोसले, दिपक डुम्मलवाड, मोहन परब, पोहवा /हरीष तावडे, अभिजीत मोरे, हेमंत महाले, अमोल देसाई, हुसेन तडवी, शिवाजी रावते, शिवाजी वासरवाड, अजय सपकाळ, अमित सपकाळ, नंदकिशोर सोनगिरे, गिरीष पाटील, पोशि/प्रमोद जमदाडे, आबाजी चव्हाण, चापोना / अनुप राक्षे, मपोहवा / शिल्पा कसबे, मपोशि / कोमल लादे यांनी केली आहे.

**पोलीस प्रशासनातर्फे लोकांना आव्हान**

अंमली पदार्थ विक्री, साठवणुक, वाहतुक, सेवन करणे हा अपराध असुन यामध्ये सहभागी असलेले इसमाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचे दुरध्वनी क्रमांक ०२२/२५३९६६८७ यावर देण्यात द्यावी. माहिती देणारे इसमांची नांवे गोपनीय ठेवली जातील.

# करिअर कट्टा संकल्पनेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास - यशवंत शितोळे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** आजच्या स्पर्धेच्या व जागतिकीकरणाच्या युगामध्ये जो कोणी स्वत:ला कळविण्यासाठी सक्षम असेल. त्यातच विकास होईल. त्यासाठी करिअर कट्टा सारख्या उपक्रमातून गरजू गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य प्राप्त करून, तो स्वत: च्या पायावर उभा राहील व तो पुढे चालून उद्योजक व स्वावलंबी बनला पाहिजे. असे मत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी व्यक्त केले.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर म हाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी संवाद कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

शितोळे म्हणाले की, करियर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रगतीसाठी तयार केलेले दालन आहे. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा व करियर कट्ट्याचा आपला सर्वांगीण विकासासाठी उपयोग करून



घ्यावा. करियर कट्टा या उपक्रमातून आयएएस, युपीएससी, एमपीएससी, सायबर सेक्युरिटी, ई-फायलिंग स्पर्धा परीक्षा याची योग्य व आवश्यक मार्गदर्शन केले जाईल.

त्यातून विद्यार्थी हाच घटक उच्च पदस्त होऊ शकतो. हा उपक्रम विद्यार्थी भूमिका असल्याम ुळे त्याचा पुरेपूर फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी करिअर कट्टा उपक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सक्रिय सहभाग नोंदवून उज्वल भविष्याकडे वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर प्रमुख अतिथी म्हणून करिअर कट्टा उपक्रमाचे अहिल्यानगर जिल्हा प्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा प्राचार्य डॉ सतीशचंद्र सुर्यवंशी करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. विलास सुद्रिक उपस्थित होते. करिअर कट्टा महाराष्ट्र शासन व महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सदर कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक उपप्राचार्य प्रा.विरेंद्र धनशेट्टी यांनी केले सुत्रसंचालन प्रा. संकेत ठाणगे आभार डॉ.जिजाभाऊ घुले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

